## प्रकरण - 9 (पुस्तिका -3)

## निर्णय प्रक्रियेसाठी अनुसरण्यात येणारी कार्यपद्धती

9.1 विविध विषयांबाबत निर्णय घेण्यासाठी कोणती कार्यपद्धती अनुसरण्यात येते ? (सेक्रेटनॅट मॅन्युअल व रूल ऑफ बिझनेस मॅन्युअल व इतर नियम/ कायदे संदर्भ घेता येतो.)

कंत्राट तरतूदींनुसारचे सर्व तांत्रिक बाबींचे निर्णय कार्यकारी अभियंता घेतात किंवा उप-प्रमुख अभियंता यांच्याकडे संदर्भित करतात. कंत्राटाच्या तरतूदींव्यतिरिक्तच्या विषयांबाबतच्या निर्णयांसाठी योग्य माध्यमांद्वारे सक्षम प्राधिकाऱयांकडे मान्यतेसाठी / मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येतात. म्हणजेच संबंधित खाते - लेखाविभाग -सक्षम प्राधिकारी.

9.2 महत्त्वाच्या मुद्यांबाबत निर्णयाप्रत येण्याकरीता कोणती लिखित कार्यपद्धती / निर्देशित कसोट्या / नियम आहेत ? निर्णय प्रक्रिया कोणत्या विविध पातळ्यांवर चालते ?

याबाबतचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना देण्यात आले आहेत. कंत्राटाच्या कार्यकक्षेबाहेरच्या विषयाबाबतच्या निर्णयाप्रत येण्याकरीता विविध पातळ्यांवर म.न.पा. आयुक्तांनी वेळोवेळी प्रसारीत केलेल्या त्याबाबतच्या कार्यपद्धतींची माहिती देणारी परिपत्रके संदर्भित केली जातात. ही सर्व प्रक्रिया संरचनात्मक सत्तेनुसार चालते.

9.3 जनतेपर्यंत निर्णय पोहाचविण्याकरीता कोणती व्यवस्था केली आहे ?

या खात्यास गैरलागू आहे कारण हे खाते विविध संस्था व कंत्राटदार यांच्याबरोबरच काम करीत असल्याने संबंधित निर्णय फक्त त्यांनाच कळविण्यात येतात. तसेच विविध प्रकल्पांची माहिती प्राधिकाऱयांनी मान्य केलेल्या संपर्क माध्यमांद्वारे जनतेला दिली जाते.

9.4 निर्णय प्रक्रियेत कोणकोणत्या पातळीवरील अधिका-यांचे मत घेतले जाते ?

जसे प्रकरण असेल त्यानुसार उप-प्रमुख अभियंता व वरिष्ठ दर्जाच्या अधिका-यांचे मत घेतले जाते.

9.5 निर्णय घेणारे अंतिम प्राधिकारी कोण ?

पुस्तिकेत नमूद केलेल्या अधिका-यांच्या प्रत्यायोजनांनार.

9.6 कृपया लोकप्राधिकरणाकडून महत्त्वाच्या विषयांबाबतच्या मुद्याबाबत घेण्यात येणा-या निर्णयांबाबत खालील विहीत नमून्यांत माहिती देण्यात यावी.

| निर्णयाबाबतचा विषय | तांत्रिक | प्रशासकीय | इतर |
|---|---|---|---|
| मार्गदर्शक तत्वे / निर्देश काही असल्dयास | तपशील, आराखडे, प्रमाणभूत अभियांत्रिकी पद्वत, प्रचलित अभियांत्रिकी पद्धती. | म.न.पा.सेवा नियमावली, विविध परिपत्रके | म.न.पा.सेवा नियमावली, केंद्र व राज्य सरकारची इतर वैधानिक प्राधिकरणे |
| कार्यवाहीची प्रक्रिया | कंत्राटाच्या शर्तीनुसार | मुंबई महापालिका अधिनियम व अनुसूचित पोटनियम | काही नाही |
| निर्णय प्रक्रियेशी संबंधित असलेल्dया अधिकाऱ्याचे पद | 9.4 प्रमाणे. | | |
| वरील अधिकाऱ्यांच्या संपर्काबाबतची माहिती | कार्यकारी अभियंता (संबंधित)<br>पाणी पुरवठा प्रकल्प खाते<br>बृहन्मुंबई महानगरपालिका, 1ला मजला, बाळकुम ऑक्ट्रॉय नाक्यासमोर, जुना भिवंडी रस्ता, बाळकुम ठाणे- 400 608. | उपप्रमुख अभियंता (पा.पु.प्र.) यां.व वि.-1<br>बृहन्मुंबई महानगरपालिका, 1ला मजला, बाळकुम ऑक्ट्रॉय नाक्यासमोर, जुना भिवंडी रस्ता, बाळकुम ठाणे- 400 608. | |
| निर्णयाने समाधान न झाल्यास कुठे व कशी दाद मागावी? | प्रमुख अभियंता(पाणी पुरवठा प्रकल्प) यांचे कार्यालय,<br>इंजिनिअरिंग हब,पहिला मजला,<br>डॉ.ई.मोझेस रोड,<br>वरळी,<br>मुंबई- **400 018.** | महापालिका उप-आयुक्त<br>(विशेष अभियांत्रिकी)<br>मुख्य कार्यालय, विस्तारित इमारत, तिसरा मजला, महापालिका मार्ग,<br>मुंबई - 400 001. | |